**विद्यमान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पुलगाव यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी – मयुर ई. पवार यांचे समक्ष)**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ०१/२०१८**

**(C.N.R. NO. MHWR-07-000014-2018)**

१. श्रीमती ताई दिगांबर मुन,
वय – ५७ वर्ष, धंदा – गृहिणी,
रा. लुंबिनी नगर, वार्ड क्रं.३,
नाचणगाव, ता. देवळी, जि. वर्धा

२. आरती दिगांबर मुन,
आरती बापुराव खेळकर(लग्नानंतर),
वय – ३८ वर्ष, धंदा – गृहिणी,
रा. बापटवाडी, सिंधी मेघे,
वर्धा, ता. व जि. वर्धा,

३. राजेश दिगांबर मुन,
वय – ३६ वर्ष, धंदा – नोकरी,

४. आशिष दिगांबर मुन,
वय – ३४ वर्ष, धंदा – वकिली,
अ.क्रं. ३ व ४ रा. लुंबिनी नगर,
वार्ड क्रं. ३, नाचणगाव,
ता. देवळी, जि. वर्धा, ........... **अर्जदार**

**– विरुद्ध –**

निरंक ............ **गैरअर्जदार**

---

अर्जदारतर्फे वकील – श्री. एस. जी. बोरकर
गैरअर्जदारातर्फे वकील – कोणीही नाही.

---

**निशाणी क्र. १ वर आदेश**
(पारीत दिनांक – ०५ मार्च, २०१८)

प्रस्तुतचा अर्ज वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२) अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत नामे दिगांबर बापुराव मुन यांचे वारसदास असुन त्यांचा दिनांक १२–११–२०१७ रोजी लुंबिनी नगर, नाचणगाव, ता. देवळी, जि. वर्धा येथे मृत्यु झाला. मयत दिगांबर बापुराव मुन यांच्या नावे मौजा नाचणगाव, लुंबिनी नगर, ता. देवळी, जि. वर्धा मध्ये घर क्रं. १८१२ हे घर आहे व ती मालमत्ता ग्रामपंचायत नाचणगाव येथे कर आकारणी विभागामध्ये मृतकाच्या नावाने आहे. त्यांच्या मृत्युनंतर सदर मालमत्तेसाठी अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणुन अर्जदारांची

विनंती आहे की, ते मयत दिगांबर बापुराव मुन यांचे कायदेशीर वारस आहेत.

३) अर्जदारकडुन 'दैनिक पुण्यनगरी' या वर्तमानपत्रात जाहीरात (नि.क्रं. १६) देवुन हरकत मागविण्यात आली. विहित मुदतीत कोणतीही हरकत न्यायालयासमक्ष घेण्यांत आलेली नाही.

४) साक्षदार क्रं. १ आशिष दिगांबर मुन यांनी निशाणी क्रं. ८ प्रमाणे प्रतिज्ञापत्राद्वारे साक्ष दिली. अर्जदाराने खालील दस्तऐवज दाखल केलेले आहेत –

| अ. क्रं. | कागदपत्रांचे वर्णन | नि. क. |
|---|---|---|
| १ | मयत दिगांबर भाउराव मुन यांचे मृत्युप्रमाणपत्र | नि.क्रं. १० |
| २ | मयत दिगांबर भाउराव मुन यांचे नावे असलेले विदयुत बिल | नि.क्रं. ११ |
| ३ | अर्जदार क्रं. १ ते ४ यांचे आधारकार्डची प्रत | नि.क्रं. १२ ते १५ |
| ४ | दि. १६-०१-२०१८ रोजीचे 'दैनिक पुण्यनगरी' मध्ये दिलेली जाहीर नोटीस | नि.क्रं. १६ |

५) अर्जदार साक्षदार क्रं. १ आशिष मुन याने साक्षमध्ये, अर्जात नमुद केलेल्या बाबी सांगितलेल्या आहेत. त्याने असे सांगितले की, ते व अर्जदार क्रं. २ ते ४ हे मयत दिगांबर भाउराव मुन यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत दिगांबर भाउराव मुन यांच्या नावे मौजा नाचणगाव, लुंबिनी नगर, ता. देवळी, जि. वर्धा मध्ये घर क्रं. १८१२ हे घर असुन त्यांच्या मृत्युनंतर सदरील घर व विदयुत मीटर अर्जदारांच्या नावे नोंद घेण्यांकरिता अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

६) अर्जदारांनी अभिलेखावर दाखल केलेले दस्तऐवज व पुरावा पाहता असे दिसुन येते की, अर्जदार हे मयत दिगांबर बापुराव मुन यांचे वारस आहेत. वर नमुद केल्याप्रमाणे प्रकरणामध्ये कोणीही आक्षेप घेतलेला नाही. करिता, खालील आदेश पारीत करण्यांत येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदारांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र योग्य ते शुल्क आकारुन देण्यात यावे.

स्वा/-
(मयुर ई. पवार)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
पुलगाव

दिनांक – ०५-०३-२०१८

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करते की, पी. डी. एफ. करुन अपलोड केलेल्या आदेशामधील शब्द-नि-शब्द हे मुळ आदेशा प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | सौ.श्वेता मो. केशरवानी. |
| न्यायालयाचे नाव | : | न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, पुलगाव |
| आदेश दिनांक | : | ०५-०३-२०१८ |
| आदेशावर पीठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | : | ०५-०३-२०१८ |
| आदेश अपलोड केल्याचा दिनांक | : | ०५-०३-२०१८ |